डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर संलग्नित

पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

ता.फुलंब्री, जि.छत्रपती संभाजीनगर

# आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग

## वार्षिक अहवाल

## २०२२-२०२३

प्राचार्य

डॉ.एस.आर.टकले

कार्यक्रमाधिकारी

डॉ. पी.एम.कल्याणकर

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर संलग्नित

व

पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

## आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग

## वार्षिक अहवाल
## २०२२-२०२३

## अनुक्रमणिका


| अ.क्रं | तपशील |
|---|---|
| | मराठीतील अहवाल |
| १ | महाविद्यालय स्तरावरील उपक्रम |
| २ | समाज स्तरावरील उपक्रम |
| ३ | विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा |
| ४ | स्वयंनिर्वाही प्रमाणपत्र अभ्यासक्रम |
| ५ | इंग्रजीतील अहवाल |
| ६ | फोटो अहवाल |
| ७ | वर्तमानपत्रातील प्रसिद्धी |
| ८ | कार्यक्रम पत्रिका- विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा |

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर संलग्नित

व

पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

## आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग

## वार्षिक अहवाल

## २०२२-२०२३

श्री संत सावता माळी ग्रामीण महविद्यालयाच्या आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्यावतीने शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ मध्ये विविध उपक्रम राबवल्या गेले. यामध्ये महाविद्यालय स्तर, समाजस्तर आणि विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेचा समावेश आहे. महाविद्यालयाच्या या विभागाच्यावतीने या शैक्षणिक वर्षामध्ये एक स्वयंनिर्वाह प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुद्धा चालवला गेला. या विविध उपक्रमांचा अहवाल पुढील प्रमाणे दिलेला आहे.

## १. महाविद्यालय स्तरावरील उपक्रम :

### १.१ विद्यापीठ स्तरीय कार्यशाळेतील सहभाग :

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आजीवन व शिक्षण व विस्तार विभागाच्यावतीने महाविद्यालयाचे प्राचार्य, कार्यक्रमाधिकारी व स्वयंसेवकासाठी कार्यशाळा घेतल्या गेल्या. या तिन्ही कार्यशाळांमध्ये महाविद्यालयाने सहभाग घेतला.

| अ.क्र. | दिनांक | कार्यशाळा प्रकार | सहभागीचे नाव |
|---|---|---|---|
| ०१ | १०/११/२०२२ | प्राचार्यांची सहविचार सभा | प्राचार्य, डॉ.एस.आर.टकले |
| ०२ | १५/११/२०२२ | कार्यक्रमाधिकारी कार्यशाळा | प्रा.डॉ.पी.एम.कल्याणकर |
| ०३ | १६/११/२०२२ | स्वयंसेवक कार्यशाळा | दुर्गा भगवान बनसोडे<br>अश्विनी गणेश खटे<br>मनीषा एकनाथ कुदळे |

### १.२ स्वातंत्र्यदिनी विशेष व्याख्यान :

१५ ऑगस्ट २०२२ रोजी आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या वतीने भारतीय स्वातंत्र्यांच्या अमृतमहोत्सवी सोहळ्यानिमित्त **''भारताची स्वातंत्र्यानंतरची वाटचाल''** या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून डॉ.राजेंद्र शेजुळ (विभाग प्रमुख, राज्यशास्त्र विभाग, विवेकानंद महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर) यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ.एस.आर.टकले उपस्थित होते. तसेच माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष, श्री.अनिलजी दुतोंडे, श्री.राधेश्याम मिसाळ, श्री.रमेश तुपे उपस्थित होते. या वेळी बोलत असताना, डॉ.राजेंद्र शेजुळ म्हणाले की, स्वातंत्र्य मिळाले पण वाटचाल कशी झाली, याविषयी विचार करावा लागेल. व्यक्तीचा आणि देशाचा विकास कसा घडून येईल याचाही विचार, घटना समितीने केलेला दिसतो. भारतीय घटना समितीने मानवी मूल्ये व तत्वे यावर सखोल असे काम केले आहे. त्यामुळे आपण सर्वांनी भारतीय राज्यघटना समजून घ्यावी. पुढे ते असेही म्हणाले की, ''भारत बलवान करायचा असेल किंवा विकास साधायचा असेल तर गावापेक्षा व्यक्ती केंद्रबिंदू असायला हवा. अर्थात व्यक्तीचा दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न झालेला आहे. तसेच लोकशाही निरंतर मजबूत रहावी यासाठी खबरदारी घेतलेली दिसते. परंतु आजही सामाजिक आणि आर्थिक लोकशाही निर्माण होणे बाकी आहे परंतु ती होणे आवश्यक आहे, असे मत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य, डॉ.एस.आर.टकले यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाचे प्रमुख, प्रा.डॉ.पांडुरंग कल्याणकर यांनी केले. उपस्थित मान्यवरांचे आभार प्रा.नितीन माळेगावकर यांनी मानले.

### २. समाज स्तरावरील उपक्रम :

शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ मध्ये विभागाच्यावतीने समजास्तरावरील उपक्रमांतर्गत दरेगाव (दरी), ता.फुलंब्री येथे पुढील व्याख्यानांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

### २.१ दरेगाव (दरी) येथे शेतीवर आधारित व्यवसायिक मार्गदर्शन :

दिनांक १७ फेब्रुवारी २०२३ रोजी आजीवन शिक्षण व विस्तार विस्तार विभागाच्या वतीने समाजस्तरावरील उपक्रमाअंतर्गत दरेगाव (दरी) येथे शेतीवर **'आधारित व्यवसायिक मार्गदर्शने'**

या विषयावर प्रगतशील शेतकरी श्री.भगवान कारभारी वाघ यांचे व्याख्यान ठेवण्यात आले होते. या कार्यक्रमास श्री.रतन ज्ञानदेव अंभोरे (सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळाचे सामाजिक कार्यकर्ते) यांची प्रमुख उपस्थिती होती, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे सरपंच श्री.गुणाजी जयराम मालोदे हे होते.

यावेळी मार्गदर्शन करीत असताना, श्री.भगवानराव वाघ म्हणाले की, शेतक-यांनी उत्पन्नाचे विविध स्त्रोत निर्माण केले पाहिजेत. मका व कापूस हीच पारंपारिक पिके न घेता आपल्या शेतात कायम स्वरुपी उत्पन्न मिळवून देणारी झाडे लावली पाहिजे. यावेळी त्यांनी त्यांच्या तीन एकर शेतीवर आंबा, चिकू, लिंबू या फळवर्गीय झाडांची तसेच शेवगा या भाजी देणा-या झाडाची लागवड करुन कायम स्वरुपी उत्पन्न मिळवून देणारे स्त्रोत निर्माण केल्याचे त्यांनी सांगितले, तसेच शेतक-यांनी शेतमाल उत्पादित केल्यानंतर तो ग्राहकांपर्यंत पोहोचवला पाहिजे, त्यामुळे त्यांना अधिक उत्पन्न मिळू शकेल असे मत त्यांनी मांडले. तसेच भाजीपाल्याची लागवड करुन सुद्धा शेतक-यांनी त्यांच्या शेतातून सातत्याने उत्पादन काढले पाहिजे. यावेळी त्यांनी बागायती प्रमाणेच कोरडवाहू क्षेत्रासाठी चिंच, शेवगा, बिबा या झाडांची लागवड करण्याचे सांगितले. तसेच एकाच शेतक-यांनी प्रयोग करण्यापेक्षा गट शेतीच्या माध्यामातून शेती केली पाहिजे असा सल्ला त्यांनी उपस्थितांना दिला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले श्री.रतन अंभोरे यांनी ग्रामीण विकास या विषयावर मार्गदर्शन केले. "गावाच्या सहकार्यातून गावात जलसिंचनाचे कामे करुन जमिनीतील पाण्याच्या पातळीत वाढ करता येईल" असे त्यांनी मत मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.पी.एम.कल्याणकर यांनी केले तर आभार सोसायटी चेअरमन श्री.शामराव मालोदे यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंलाचन श्री.ऋतुजा अंभोरे हिने केले तर पाहुण्यांचा परिचय श्री.ऋषीकेश अंभोरे या विद्यार्थ्याने दिला. या कार्यक्रमास गावचे, पोलिस पाटील बाबुराव मालोदे, तंटामुक्ती अध्यक्ष नाना पाटील मालोदे, शालेय समिती अध्यक्ष दिनकर भाऊ मालोदे, भाऊसाहेब मालोदे, माजी सरपंच श्री.बाजीरावा मालोदे, सखाराम मालोदे, ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य व मोठ्या प्रमाणात ग्रामस्थ उपस्थित होते.

## २.२ 'तृण धान्यातून ग्रामीण विकास' या विषयावर दरेगाव दरी येथे व्याख्यान :

महाविद्यालयाच्या आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग व तालुका कृषी कार्यालय, फुलंब्री यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २७ फेब्रुवारी २०२३ या दिवशी दरेगाव या गावात 'तृणधान्यातून ग्रामीण विकास' या विषयावर श्री. निवृत्ती जोरी (मंडळ कृषी अधिकारी, फुलंब्री) यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना श्री.निवृत्ती जोरी म्हणाले की, भारताने अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यासाठी गहू आणि तांदळाच्या उत्पादनावर भर दिला. यातून आपण अन्नधान्याची स्वयंपूर्णता साधली असली तरीसुध्दा रासायनिक खतांच्या आणि कीटकनाशकांच्या अतिवापरामुळे जमिनीचा पोत खराब झाला.

१९६५ पूर्वी भारतामध्ये तृणधान्य पिकांचे (भरड धान्य) मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतल्या जात होते. यामध्ये ज्वारी, बाजरी, भगर, राळा, नाचणी इत्यादी तृणधान्य पिकांचे आपल्या देशामध्ये मोठ्या प्रमाणात उत्पादन होत होते. ही पिके हलक्या जमिनीत येतात, कमी पावसात येतात, तसेच या पिकांवर बुरशी पडत नसल्यामुळे बुरशीनाशके आणि कीटकनाशकांचा फारसा वापर करावा लागत नाही. त्यामुळे कमी उत्पादन खर्चात ही पीक येतात आणि जमिनीचा पोत सुध्दा सुधारतो. गहू आणि तांदळाच्या आहारातील जास्तीच्या वापरामुळे माणसाच्या प्रकृतीवर त्याचा वाईट परिणाम होत आहे व रोगांचे प्रमाण वाढत आहे.

बाजरी, ज्वारी, भगर, राळा, नाचणी यासारख्या तृणधांन्याचा आहारात वापर केल्यास त्यामुळे शरीरातील आयर्न, कॅल्शियम, प्रोटीन, मॅग्नेशियम यामध्ये वाढ होते आणि मनुष्य हा अधिक सदृढ राहतो. त्यामुळे जमीन आणि मनुष्याच्या प्रकृतीसाठी तृणधान्ये ही उपयुक्त आहेत. मनुष्य आणि जमिनीच्या आरोग्यासाठी तृणधान्यांचे महत्त्व भारताने जगाला लक्षात आणून दिल्यामुळे संपूर्ण जगात २०२३ हे तृणधान्य वर्ष म्हणून साजरे केल्या जात आहे. तेव्हा शेतक-यांनी तृणधान्य पिकांच्या उत्पादनाकडे वळावे असा सल्ला त्यांनी दिला. यावेळी व्याख्यान कार्यक्रमाच्या अगोदर त्यांनी तृणधान्यावरील स्वंयरचित अभंग सुद्धा ऐकविला.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष गावचे सरपंच गुणाजी मालोदे हे होते, कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री अशोक चव्हाण यांनी केले तर प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.पी.एम. कल्याणकर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय सोमनाथ ठाले यांनी करून दिला. कार्यक्रमाचे आभार सोसायटी चेअरमन श्री

शामराव मालोदे यांनी मानले. यावेळी कृषी साहाय्यक श्री रामभाऊ साळुंके, तसेच श्री.विठ्ठल गोराडे यांनी सुध्दा मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमासाठी गावच्या उपसरपंच वंदना मालोदे, तंटमुक्ती अध्यक्ष नाना पाटील मालोदे, कुशवृत्ता दुधे, अंबादास दुतोंडे, भाऊसाहेब मालोदे, विष्णू मालोदे, सुरेश मालोदे, भिकाजी मालोदे, पांडुरंग मालोदे, दादा पाटील मालोदे, शहाजी मालोदे, सखाराम मालोदे, रामेश्वर मालोदे, सुमित्राबाई मालोदे, शोभाबाई मालोदे, विठ्ठल दुधे तसेच मोठ्या प्रमाणात ग्रामस्थ आणि शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते.

## ३. विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा

## दिनांक २२ व २३ फेब्रुवारी २०२३

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयाच्या आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्यावतीने दिनांक २२ व २३ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत दोन दिवशीय विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेचे आयेजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत पुढील विविध सत्रांचे आयोजन करण्यात आले.

## दिनांक २२ फेब्रुवारी २०२३

**३.१ उद्घाटन सत्र :** या कार्यशाळेचे उद्घाटन डॉ.संजय मुन (संचालक, आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग, डॉ.बा.आं.म.वि, छत्रपती संभाजीनगर) यांनी केले. यावेळी बोलताना ते म्हणाले की, शिक्षणातून रोजगार क्षमता तरूणामध्ये निर्माण झाली पाहिजे. भारतात तरुणांची संख्या एकूण लोकसंख्येच्या ६० टक्के पेक्षा जास्त आहे. या तरुणांच्या संख्येच्या बळावर भारत विकसित होण्याचे स्वप्न पाहत आहे. या तरुणांना उत्पादक कार्यात आणण्यासाठी त्यांच्याकडे कौशल्य असली पाहिजेत. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन जीवनामध्ये विविध कौशल्य विकसित केली पाहिजेत. महाविद्यालयातील पाच वर्ष विद्यार्थ्यांच्या जीवनात अत्यंत महत्त्वाची असतात, या कालावधीत त्यांनी स्वतःला रोजगारक्षम बनवले पाहिजेत. भारतीय शिक्षण व्यवस्थेत आतापर्यंत सिद्धांतांना अधिक महत्त्व दिल्या गेले व प्रयोगाकडे दुर्लक्ष केल्या गेले. त्यामुळे तरुणांमध्ये रोजगारक्षमता

विकसित होऊ शकल्या नाहीत, त्यामुळे या पुढील काळात प्रयोगांना अधिक महत्व देणे गरजेचे आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

यासत्राचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य, डॉ.एस.आर.टकले यांनी केला. दोन दिवसीय कार्यशाळेतून विद्यार्थ्यांना विविध घटकांवर मार्गदर्शन होणार आहे, याचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घेतला पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.ऋतुजा अंभोरे हिने केले, प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ.पी.एम.कल्याणकर यांनी केले, पाहुण्यांचा परिचय डॉ.महेश थोरात यांनी करून दिला तर प्रार्थना कु.उर्मिला ढोके, कु.अश्विनी खटे, कु. गौरी वाघमारे यांनी म्हटली तर आभार कु.गायत्री दुतोंडे हिने मानले.

## ३.२ सत्र दसरे: लेखन व संभाषण कौशल्य

कार्यशाळेत दुस-या सत्रात लेखन व संभाषण कौशल्य या विषयावर डॉ.कैलाश इंगळे (मराठी विभाग प्रमुख, राजश्री शाहू महविद्यालय, पार्थी) यांनी मार्गदर्शन केले. मनुष्य सोडून इतर सर्व प्राण्यांना भाषा नाही. जगातील प्रत्येक भाषेला एक लिपी आहे, या लिपीचा वापर लिखानासाठी व संपादित करण्यासाठी केला जातो. भाषेचे चांगले ज्ञान असेल तर त्याचा वापर प्रभावी संभाषणासाठी व लिखनासाठी केला जाऊ शकतो. एकापेक्षा अधिक भाषेचे ज्ञान असेल तर दुभाषक, अनुवादक म्हणून रोजगार मिळू शकतो. तेव्हा विद्यार्थ्यांनी विविध भाषा चांगल्या प्रकारे आत्मसात केल्या पाहिजेत, असे मत त्यांनी मांडले. या सत्राचा अध्यक्षीय समारोप डॉ.संजय पांचाळ (साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, प्रस्तुत महाविद्यालय) यांनी केला. या सत्राचे सूत्रसंचालन कु. उर्मिला ढोके हिने केले तर आभार कु.ऋतुजा अंभोरे हिने मानले.

## ३.३ सत्र तिसरे: व्यक्तीमत्त्व विकास

व्यक्तिमत्त्व विकास या कार्यशाळेच्या तिस-या सत्रात व्यक्तीमत्त्व विकास विषयावर डॉ.सुरेश मुंढे (सहयोगी प्राध्यापक, हिंदी विभाग, प्रस्तुत महाविद्यालय) यांनी मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी सकारात्मकता बाळगणे, आत्मविश्वास असणे, अधिकाधिक वाचन करणे, अपयशाची भीती न बाळगणे, आनंदी राहणे, इतरांचे बोलणे काळजीपूर्वक ऐकणे, संयम राखणे,

स्वत:चे वेगळे व्यक्तिमत्त्व निर्माण करणे, आपल्या पेहरावा बाबत सतर्कता असणे, इतरांच्या यशांचे कौतुक करणे इत्यादी गुण व्यक्तिमत्त्व विकसित करण्यासाठी गरजेचे आहेत, असे मत मांडले.

या सत्राचा अध्यक्षीय सामारोप डॉ.मंजुषा नळगिरकर यांनी केला. यावेळी त्या म्हणाल्या की, बाह्य व्यक्तीमत्त्वा बरोबरच आपण आंतरिक व्यक्तीमहत्त्वाच्या विकासावर सुध्दा भर दिला पाहिजेत. या सत्राचे सूत्रसंचालन कु.गायत्री दुतोंडे हिने केले तर आभार कु.उर्मिला ढोके हिने मानले.

## दिनांक २३ फेब्रुवारी २०२३

## ३.४ सत्र चौथेः यशस्वी उद्याजकाची मुलाखत

कार्यशाळेच्या दुस-या दिवशी चौथ्या सत्रात यशस्वी उद्योजकाची मुलाखत या विषयाअंतर्गत 'शक्ती डायमंड टूल्सचे, संचालक, श्री.उत्तम शेषराव पतंगे यांची डॉ.महेश थोरात यांनी मुलाखत घेतली. त्यांच्या उद्योगात विविध प्रकारच्या उद्योगांना लागणा-या कटिंग व्हिल्सचे उत्पादन घेतल्या जाते. उद्योगाची सुरूवात दहा बाय, बाराच्या खोलीतून झाली, आज त्यांचा वाळूज एमआयडीसी या ठिकाणी मोठ्या भूखंडामध्ये उद्योग आहे. सुरूवातीला फक्त ०३ मजूर होते, आता मजुरांची संख्या ३० पेक्षा जास्त झाली आहे. उद्योगाची सरूवात २५ हजार रुपयांच्या भांडवलातून झाली आता ६० कोटी रूपयांपेक्षा अधिक भांडवल आहे.

कोणताही उद्योग सुरू करण्याअगोदर त्या उद्योगाचा सहा महिने तरूणांनी अभ्यास करावा. उद्योगासाठी लागणारे भांडवल उभे करण्यासाठी बँकेमध्ये पत निर्माण करणे गरजेचे आहे. तसेच कोणत्याही उद्योगाची सुरूवात लहान भांडवलातून करावी. तसेच जेवढ्या भांडवलाची गरज आहे, त्यापेक्षा अधिकचे भांडवल उभारण्याची क्षमता उद्योजकाने ठेवावी, म्हणजे संकटाच्या काळात त्या भांडवलाचा उपयोग उद्योगासाठी होऊ शकतो. उद्योगात येणा-या संकटांना पेलण्याची तयारी आपण ठेवली पाहिजेत. यावेळी त्यांनी आपला अनुभव सांगताना म्हणाले की, एकदा त्यांच्या उद्योगात चोरी झाली तर त्यांचे छोटे बंधू म्हणाले की, ''चोरांनी आपला माल चोरला व परंतु ते वस्तू तयार

करण्याचे आपले तंत्र मात्र चोरु शकले नाहीत.'' त्यांनी परत आपला उद्योग जोमाने सुरू केला. उद्योग करताना उद्योजकाने लाज व भीती बाळगता कामा नये, असे ते म्हणाले.

या सत्राचे सूत्रसंचालन कु.आरती प्रधान हिने केले, पाहुण्यांचा परिचय कु.ऋतुजा अंभोरे हिने करून दिला. सुरुवातीस प्रार्थना कु.उर्मिला ढोके, कु.ऋतुजा अंभोरे यांनी म्हटली. या सत्राचे आभार कु.पुनम दाभाडे हिने मानले.

## ३.५ सत्र पाचवे: स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

शिबिरातील पाचव्या सत्रात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन या विषयावर श्री. धनंजय पाटील (प्रशासक, द युनिक अकॅडमी, छत्रपती संभाजीनगर) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. स्पर्धा परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी शालेय स्तरावरील पुस्तकांचा बारकाईने अभ्यास करावा, पुस्तकांचे वारंवार वाचन करावे. तसेच अभ्यासाठी दिवसातील वेळेचे नियोजन करावे. दीर्घोत्तरी प्रश्नांची तयारी करण्यासाठी आपण प्रश्नांची उत्तरे वारंवार लिहून पहावीत, त्यातून आपोआपच आपल्या उत्तरात सुधारणा होत जाईल. या सत्राचा अध्यक्षीय समारोप डॉ.नितीन माळेगावकर (वाणिज्य विभाग, प्रस्तुत महाविद्यालय) यांनी केला. कार्यक्रमास डॉ.नंदकुमार झरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

या सत्राचे सूत्रसंचालन कु.ऋतुजा अंभोरे हिने केले, पाहुण्यांचा परिचय कु.गायत्री दुतोंडे हिने करून दिला तर आभार कु.उर्मिला ढोके हिने मानले.

## ३.६ समारोप सत्र

दिनांक २३ फेब्रुवारी २०२३ रोजी कार्यशाळेचा समारोप झाला. समारोप सत्रामध्ये मुलाखत तंत्र या विषयावर प्रा.डॉ.रामकिशन लोमटे (राज्यशास्त्र विभाग, प्रस्तुत महाविद्यालय) यांनी मार्गदर्शन केले. यावेळी ते म्हणाले की, मुलाखतीस जाताना विद्यार्थ्यांनी व्यवस्थित अभ्यास करून जावा. मुलाखतीच्या हॉलमध्ये जाताना व बसताना उमेदवारांनी नंम्रतापूर्वक वर्तन करावे. विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे येत असतील तर ती स्पष्टपणे द्यावीत.

या सत्राचा अध्यक्षीय समारोप प्रा.डॉ.राजश्री पवार (मराठी विभाग, प्रस्तुत महाविद्यालय) यांनी केला. दोन दिवशीय कार्यशाळेविषयी कु.ऋतुजा अंभोरे व कु. गायत्री दुतोंडे यांनी आपली

मनोगते व्यक्त केली. त्याचे सूत्रसंचालन कु.राधा मिसाळ यांनी केले तर आभार कु.ऋतुजा अंभोरे हिने मानले.

## ४. स्वयंनिर्वाही प्रमाणपत्र अभ्याक्रमः

विद्यापीठाच्या आजीवन शिक्षण विभागाच्या मंजुरीनंतर महाविद्यालयाच्या आजीवन शिक्षण विभागाने विक्री प्रतिनिधी हा स्वयंनिर्वाही प्रमाणपत्र अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ मध्ये राबविला. या अभ्यासक्रमासाठी एकूण २६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. या अभ्यासक्रमाचे समन्वयक म्हणून डॉ.महेश थोरात यांनी काम पाहिले.

**कार्यक्रमाधिकारी**
डॉ. पी.एम.कल्याणकर

**प्राचार्य**
डॉ.एस.आर.टकले

प्राचार्य
श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय
फुलंब्री जि. औरंगाबाद

Pandit Deendyal Upadhyay Education Society's

SHRI SANT SAVTA MALI GRAMIN MAHAVIDYALAYA, PHULAMBRI

Tq. Phulambri, Dist. Chhatrapati Sambhaji Nagar

Affiliated to

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University,

Chhatrapati Sambhaji Nagar

# Department of Lifelong Learning and Extension

# Annual Report

# 2022 - 2023

**Principal**

**Dr. S. R. Takle**

**Programme Officer**

**Dr. P.M. Kalyankar**

Pandit Deendayal Upadhyay Education Society's

# Shri Sant Savta Mali Gramin Mahavidyalaya, Phulambri

Tq. Phulambri, Dist. Chhatrapati Sambhji Nagar

# Lifelong Learning and Extension Department

## Annual Report

## 2022 - 2023

Lifelong Learning and Extension Department of Shri Sant Savta Mali Garamin Mahavidyalaya, Phualmabri has been organized various programme at Community level and College level during 2022-2023. Department has also taken two days Students Counseling and Career Guidance workshop. As well as during this year department has also run One Self Finance Certificate Course. The report of these various activities is given below

### 1) Extension Activity at College Level:

This department has organized following programme on college level during 2022-23

### 1.1) Participation in University Level Workshops:

Department of Lifelong Learning and Extension of Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University arranged training programme for Principal, Programme Officers, Volunteers on following dates. Our College has participated in all these three workshops.

| Sr. No. | Training | Date | Participant |
|---|---|---|---|
| 01 | Principal's meeting | 10/ 11/ 2022 | Principal Dr. S.R. Takle |
| 02 | Program Officer Workshop | 15/ 11/ 2022 | Dr. P.M. Kalyankar |
| 03 | Volunteer Workshop | 16 /11/ 2022 | Durga Bhagawan Bansode<br>Ashwini Ganesh Khate<br>Manisha Eknath Kudale |

### 1.2) Special Lecture on Independence Day:

Department of Lifelong Learning and Extension, has organised a special lecturer on August 15, 2022, Dr. Rajendra Shejul (Head of Department, Department of Political Science, Vivekananda College, Chhatrapati Sambhji Nagar) was speaker for this programme . Principal,Dr. S.R. Takle, presided over the program. Also present were members Alumni Association Mr. Anil Dutonde, Mr. Radheshyam Misal, Mr. Ramesh Tupe. While speaking on this occasion, Dr. Rajendra Shejul said that freedom has been achieved but we have to

think about how the movement has been done. It seems that the Constitution Committee has also considered how the development of the individual and the country will take place. The Constitution Committee of India has done a thorough work on human values and principles. So we all should understand Indian Constitution. He further said that if India is to be strengthened or developed, the individual should be the focal point rather than the village. Of course, efforts have been made to raise the status of the individual. Also, it seems that precautions have been taken to ensure that democracy remains strong. But even today, social and economic democracy is yet to be created but it must happen, he said.

Principal, Dr. S.R. Takle gave the presidential conclusion. The program was introduced by Prof. Dr. Pandurang Kalyankar.

## 2) Extension Activity at Community Level:

College Lifelong Learning and Extension Department has organized Community level programme in Dargaon Dari, Tq. Phulambri in academic year 2022-2023. The following lecture program was organized

### 2.1) Agriculture Based Vocational Guidance at Daregaon (Dari).

On February 17, 2023, a lecture was held by Shri Bhagwan Karbhari Wagh, a progressive farmer on the subject of **Agriculture-Based Business Guidance** at Daregaon (Dari) as part of a community-level initiative on behalf of the Department of Lifelong Learning and Extension. The chief guest of the program was Shri Ratan Danyandev Ambhore (Social Worker of Savitribai Phule Mahila Ekatm Samaj Mandal) while the program was presided over by the Village Sarpanch Shri Gunaji Jairam Malode.

While guiding on the occasion, Mr. Bhagwan Rao Wagh said that farmers should create various sources of income instead of traditional crops like maize and cotton, they should plant trees that generate permanent income in their fields. On this occasion, he said that he has created a permanent source of income by planting fruit trees such as mango, chickpea, lemon and vegetable tree Shevaga on his three-acre farm. He also advise the farmers that they should sale their products director to the consumers to get remunerative prices. On this occasion, he said to plant Tamarind, Drumstick, Bibba or Bhilava(nut tree trees) is for dryland areas like horticulture. He also advised the audience that rather than experimenting with single farmers, they should do farming through group farming.

Mr. Ratan Ambhore, who was present as the chief guest on this occasion, gave guidance on the topic of **Rural development.** He opined that "with the cooperation of the village, the water level of the ground can be increased by carrying out irrigation works in the village". The program was introduced by Dr. P.M. Kalyankar and the vote of thanks was given by Society Chairman Mr. Shamrao Malode. The program was moderated by Mr. Rituja Ambhore while the guests were introduced by Mr. Rishikesh Ambhore. Village Police Patil Baburao Malode, Tantamukti President Nana Patil Malode, School Committee President

Dinkar Bhau Malode, Bhausaheb Malode, former Sarpanch Shri Bajirao Malode, Sakharam Malode, all the members of Gram Panchayat and a large number of villagers were present in this program.

## 2.2) Lecture on 'Rural Development through Cereals' at Daregaon Dari :

On 27th February 2023 in the village Daregaon (Dari) in association with Lifelong Learning and Extension Department of the College and Taluka Agriculture Office, Phulumbri, A lecture was organized on Rural Development through Cereals (Millets) in association with Govt. Agricultural Department of Phualmbri Taluka at this time Shri. Nivritti Jori, (Block Development Agriculture Officer, Phulumbri) was main speaker. Speaking on the occasion, Shri Nivritti Jori said that India emphasized on wheat and rice production to become self-sufficient in food grains. Although we have achieved self-sufficiency in food grains through this, excessive use of chemical fertilizers and pesticides has damaged the soil texture.

Before 1965, cereal crops (coarse grains) were produced in large quantities in India. In this, cereal crops like Sorghum, Bajri, Bhagar, Rala, Nachini etc. were produced in large quantities in our country. These crops thrive in light soils, receive less rainfall, and require less use of fungicides and insecticides as these crops do not develop mildew. Hence, this crop is produced at low cost of production and the soil texture is also improved. Due to excessive consumption of wheat and rice in the diet, it is having a bad effect on human health and increasing the number of diseases.

If millet like Sorghum, Bhagar, Rala, Ragi are used in the diet, it increases iron, calcium, protein, magnesium in the body and makes a person stronger. Therefore, cereals are useful for land and human health. 2023 is being celebrated as International Year Of Millets across the world as India has made the world aware of the importance of cereals for human and soil health. He then advised the farmers to switch to cereal crop production. On this occasion, before the lecture program, he also listened to a song written on the grain.

The president of this program was village sarpanch Gunaji Malode, the program was moderated by Mr. Ashok Chavan while the introductory program officer Prof. Dr. P. M. Kalyankar. Somnath Thale introduced the guests. Society Chairman Shri Shamrao Malode gave vote of thanks for the programme. On this occasion, Shri Rambhau Salunke, and Shri Vitthal Gorade (Agriculture Assistant) also gave guidance to the villagers.

Village Deputy Sarpanch Vandana Malode, Tantamukti President Nana Patil Malode, Kushavrata Dudhe, Ambadas Dutonde, Bhausaheb Malode, Vishnu Malode, Suresh Malode, Bhikaji Malode, Pandurang Malode, Dada Patil Malode, Shahaji Malode, Sakharam Malode, Rameshwar Malode, Sumitrabai Malode, Shobhabai Malode, Vitthal Dudhe and a large number of villagers and school students were present for this programme.

## 3) Student Counseling and Carrier Guidance Workshop

A two-day student Counseling and Carrier guidance workshop was organized by the Lifelong Learning and Extension Department of Sri Sant Savta Mali Gramin Mahavidyalaya on 22nd and 23rd February 2023. The following various sessions were organized in this workshop.

### Date: 22nd February 2023

### 3.1) Inaugural Session:

This workshop was inaugurated by Dr. Sanjay Mun (Director, Department of Lifelong Learning and Extension, Dr. B.A. M, V, Aurangabad). Speaking on the occasion, he said that employability should be created in the youth through education. Youth constitute more than 60 percent of the total population in India. India is dreaming to develop on the strength of this youth population. These youth should have skills to bring them into productive work. Students should develop various skills in college life. Five years of college are very important in the life of students, during this period they should make themselves employable. In the Indian education system so far, theory has been given more importance and experiments have been neglected. Due to this, employability could not be developed among the youth, so it is necessary to give more importance to experiments in the next period.

Principal, Dr. S. R. Takle has given the presiding conclusion of the session. He expressed the opinion that maximum number of students should benefit from the two-day workshop where students will be guided on various aspects.

This session has been moderator by Rituja Ambhore , Program Officer Prof. Dr. P. M Kalyankar has given introductry speech of the programme, Dr. Mahesh Thorat introduced the guests. Mrs. Urmila Dhoke, Ms. Ashwini Khate, Ms. Gauri Waghmare said a prayer. Vote of thanks had delivered by Gayatri Dutonde.

### 3.2) Session Two: Writing and Communication Skills

In the second session of the workshop, was on the topic of **Writing and Communication Skills**. Dr. Kailash Ingle (Head, Dept. of Marathi, Rajshree Shahu College, Pathri) has guided on this topic. He guided that, "All animals except humans have no language. Every language in the world has a script, which is used for writing and editing. A good knowledge of the language can be used for effective communication and writing. If you have knowledge of more than one language, you can get employment as an interpreter, translator. He opined that students should learn various languages well. The session was concluded by Dr. Sanjay Panchal (Assistant Professor, Department of Marathi, Present College). This session was moderated by. Urmila Dhoke and vote of thank delivered by Rituja Ambhore.

### 3.3) Session III : Personality Development

In the third session of this workshop, guided by Dr. Suresh Mundhe (Associate Professor, Department of Hindi, Present College) on the topic of **Personality Development.**

At this time he opined that, "Be positive, confident, read more, not afraid of failure, be happy, listen carefully to others, maintain patience, create your own unique personality, be careful about your dress, appreciate the achievements of others that qualities etc. are necessary for personality development."

The session was concluded by Dr. Manjusha Nalgirkar. At this time, she said that along with external personality, we should also emphasize on the development of inner personality. This session was moderated by Gayatri Dutonde. Vote of thanks by Urmila Dhoke.

## Dated 23 February 2023

### 3.4) Session Four: Interview with a Successful Entrepreneur:

On the second day of the workshop, in the fourth session, **'An interview with a successful entrepreneur'** the interview of Mr. Uttam Seshrao Patange's' (Director, Shakti Diamond Tools) was conducted by Mahesh Thorat. Their industry manufactures cutting wheels for various industries. The industry started with a ten by twelve room, today they have a large plot of land at Walaj MIDC. Initially there were only 03 laborers now the number of laborers has increased to more than 30. The industry started with a capital of 25 thousand rupees and now has a capital of more than 60 crore rupees.

Before starting any industry, youth should study that industry for six months. It is necessary to create credit in the bank to raise the capital required for the industry. Also any business should be started with small capital. Also, the entrepreneur should have the ability to raise more capital than the amount of capital required, so that capital can be used for the industry in times of crisis. We should be prepared to meet the crises that are coming in the industry. On this occasion, he narrated his experience and said that once there was a theft in his industry, his younger brother said, "Thieves stole our goods but they could not steal the manufacturing techniques." He started his business again with vigour. He said that there should be no shame and fear while doing business.

This session was moderated by Ms. Aarti Pradhan, Introduction of guests of has given by Rituja Ambhore. At the beginning of the session college prayer has been song by Urmila Dhoke, Ms. Rituja Ambhore. Vote of thank of this session has delivered by Punam Dabhade.

### 3.5) Session V: Competitive Examination Guidance:

In the fifth session of the camp, on the topic of competitive examination guidance, Mr. Dhananjay Patil (Administrator, The Unique Academy, Chhatrapati Sambhji Nagar) guided the students. He told that , "For competitive exams, students should study school level books carefully, read the books repeatedly. Also plan the time of day for study. To prepare for longer questions, you should write down the answers to the questions repeatedly, it will automatically improve your answers." The session was concluded by Dr. Nitin Malegaonkar (Department of Commerce, Present College) as a president if the session. Dr. Nandkumar Zarkar was the main presence for this session.

This session was moderated by Rituja Ambhore, Introduction of guests of has given Ms. Done by Gayatri Dutonde. Vote of thank of this session has delivered by Urmila Dhoke.

### 3.6) Valedictory Session:

The workshop concluded on 23rd February 2023. In the valedictory session Prof. Dr. Ramkishan Lomte (Department of Political Science, Present College) guided on **Interview technique.** At this time, he said, "Students should study properly while going for the interview. Candidates should behave politely while going and sitting in the interview hall. Give the answer clearly, question asked by the Expert panel.." The session was concluded by Prof. Dr. Rajshree Pawar (Department of Marathi, Present College).

Participants Rituja Ambhore and Ms. Gayatri Dutonde expressed their view about the two-day workshop. This session has been moderated by Radha Misal. Vote of thank of this session has delivered by Rituja Ambhore.

## 4. Implementation Self-financed Certificate Course:

After the approval of Lifelong Learning Department of the University,, Lifelong Learning and Extension department has run **Sales Representative** Self-financed Certificate Courses in academic year 2022 - 2023 . There are 26 students have been taken admission for this course. Dr. Mahesh Thorat has worked as coordinator of this Course.

**Programme Officer**
Dr.P.M. Kalyankar

**Principal**
Dr. S.R.Takle
Phulambri. Ta. Phulambri, Dist. Aurangabad

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय,फुलंब्री
## आजीवन शिक्षण व विस्तार विभाग 2022-2023
### कार्यक्रम व उपक्रमांचा फोटो अहवाल

### महाविद्यालय स्तरावरील उपक्रम




भारताची स्वातंत्र्याची वाटचाल या व्याख्यान कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रा. डॉ. पी.एम. कल्याणकर.




स्वातंत्र्यदिनी आयोजित व्याख्यान कार्यक्रमात 'भारताची स्वातंत्र्यानंतरची वाटचाल' या विषयावर बोलताना प्रा. डॉ. राजेंद्र शेजुळ, व्यासपीठावर श्री अनिल दुतोंडे, प्राचार्य डॉ. एस. आर. टकले




स्वातंत्र्यदिनी आयोजित व्याख्यान कार्यक्रमात 'भारताची स्वातंत्र्यानंतरची वाटचाल' या विषयावर बोलताना प्रा. डॉ. राजेंद्र शेजुळ, व्यासपीठावर श्री अनिल दुतोंडे, प्राचार्य डॉ. एस. आर. टकले




कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले

## समाजस्तरावरील उपक्रम




दरेगाव (दरी) येथे आयोजित येथे आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते श्री भगवानराव वाघ यांचे स्वागत करताना श्री गुणाजी मालोदे .



दरेगाव (दरी) येथे आयोजित कार्यक्रमात श्री रतन अंभोरे यांचे स्वागत करताना ग्रामस्थ.



शेतीवर आधारित व्यवसाय मार्गदर्शन या व्याख्यान कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. पी.एम. कल्याणकर.



दरेगाव (दरी) येथील व्याख्यान कार्यक्रमात शेतीवर आधारित व्यावसायिक मार्गदर्शन या विषयावर ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना प्रमुख वक्ते श्री भगवानराव वाघ



दरेगाव (दरी) येथील व्याख्यान कार्यक्रमात शेतीवर आधारित व्यावसायिक मार्गदर्शन या विषयावर ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना प्रमुख वक्ते श्री भगवानराव वाघ



शेतीवर आधारित व्यवसायिक मार्गदर्शन या कार्यक्रमात ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना श्री रतन अंभोरे



शेतीवर आधारित व्यवसाय मार्गदर्शन या व्याख्यान कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन करताना श्री शामराव मालोदे.



तृणधान्यातून ग्रामीण विकास या व्याख्यान कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रा. डॉ. पी.एम. कल्याणकर.



तृणधान्यातून ग्रामीण विकास या विषयावर ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना श्री निवृत्ती जोरी ( मंडळ कृषी अधिकारी).




तृणधान्यातून ग्रामीण विकास या विषयावर  ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना श्री निवृत्ती जोरी ( मंडळ कृषी अधिकारी).



तृणधान्यातून ग्रामीण विकास या विषयावर मार्गदर्शन करताना दुसरे वक्ते श्री विठ्ठल बोराडे (कृषी सहाय्यक)



तृणधान्यातून ग्रामीण विकास या विषयावर मार्गदर्शन करताना श्री रामभाऊ साळुंके (कृषी सहाय्यक).



तृणधान्यातून ग्रामीण विकास या व्याख्यान कार्यक्रमाचे आभार व्यक्त करताना श्री शामराव मालोदे.

## विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा
## दिनांक 22 व 23 फेब्रुवारी 2023




विद्यार्थी समुपदेशन व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी प्रतिमा पूजन करताना प्रा. डॉ. संजय मून, प्राचार्य डॉक्टर एस आर टकले, डॉ. कैलास इंगळे, डॉ. पी.एम. कल्याणकर.



कार्यशाळेच्या उद्घाटन कार्यक्रमात प्रार्थना म्हणताना कु. उर्मिला ढोके, कु. अश्विनी खटे, कु.गौरी वाघमारे.




विद्यार्थी समुदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेचे प्रास्ताविक करताना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. पी.एम. कल्याणकर.




विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेच्या उद्घाटनसत्रात उद्घाटनपर मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. संजय मून(संचालक, आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग,डॉ. बा.आं. म, विद्यापीठ )




विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेच्या उद्घाटनसत्रात उद्घाटनपर मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. संजय मून(संचालक, आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग,डॉ. बा.आं. म, विद्यापीठ )



विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेच्या उद्घाटनसत्रात उद्घाटनपर मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. संजय मून(संचालक, आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग,डॉ. बा.आं. म, विद्यापीठ )




विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेच्या उद्घाटन सत्राचा अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. एस. आर. टकले.



विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेस लाभलेला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद



कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात 'लेखन व संभाषण कौशल्य' या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. कैलास इंगळे.



कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्राचा अध्यक्षीय समारोप करताना डॉ. संजय पांचाळ.




कार्यशाळेच्या तिसऱ्या सत्रात व्यक्तिमत्त्व विकास या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. मंजुषा नळगिरकर.




कार्यशाळेच्या तिसऱ्या सत्राचा अध्यक्षीय समारोप करताना डॉ. सुरेश मुंढे.




विद्यार्थ्यांशी संवाद साधताना श्री. अशोक चव्हाण.




कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी चौथ्या सत्रात प्रार्थना म्हणताना कु. उर्मिला ढोके व कु. ऋतुजा अंभोरे




कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी चौथ्या सत्रात यशस्वी उद्योगाची मुलाखत यामध्ये श्री उत्तमराव पतंगे (शक्ती डायमंड टूल्स) यांची मुलाखत घेण्यात आली,मुलाखत घेताना डॉ. महेश थोरात




कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवशी चौथ्या सत्रात यशस्वी उद्योगाची मुलाखत यामध्ये श्री उत्तमराव पतंगे (शक्ती डायमंड टूल्स) यांची मुलाखत घेण्यात आली,मुलाखत घेताना डॉ. महेश थोरात




कार्यशाळेच्या पाचव्या सत्रामध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन या विषयावर मार्गदर्शन करताना श्री धनंजय पाटील (प्रशासक, द युनिक अकॅडमी, छत्रपती संभाजी नगर)




कार्यशाळेच्या पाचव्या सत्रामध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन या विषयावर मार्गदर्शन करताना श्री धनंजय पाटील (प्रशासक, द युनिक अकॅडमी, छत्रपती संभाजी नगर)



पाचव्या सत्राचा अध्यक्षीय समारोप करताना डॉ. नितीन माळेगावकर



कार्यशाळेच्या समारोप सत्रात कार्यशाळेविषयी   मनोगत व्यक्त करताना कु.ऋतुजा अंभोरे



कार्यशाळेच्या समारोप क्षेत्रात कार्यशाळेविषयी मनोगत व्यक्त करताना कु. गायत्री दुतोंडे.




समारोप सत्रात मुलाखत तंत्र या विषयावर मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. रामकिशन लोमटे




समारोप सत्राचा अध्यक्ष समारोप करताना डॉ. राजश्री पवार




कार्यशाळेच्या समारोप सत्रास उपस्थित विद्यार्थ्यांचा ग्रुप फोटो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ , औरंगाबाद संलग्नित
व
पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री.

## आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग

## विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा

### दिनांक : २२ व २३ फेब्रुवारी २०२३

## निमंत्रण पत्रिका

श्री./ श्रीमती ________________________________

आपणास कळविण्यात येते की,आमच्या महाविद्यालयातील आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्यावतीने दि.२२ व २३ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत दोन दिवसीय विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे, तरी आपण या कार्यशाळेत सहभागी व्हावे ही विनंती.

### कार्यशाळेतील उपक्रम

### बुधवार,दिनांक २२ फेब्रुवारी २०२३

सत्र पहिले
उद्घाटन सत्र :- वेळ : सकाळी ११:०० ते १२:३०
**उद्घाटक व बीजभाषक :- डॉ.संजय मुन**
(संचालक, आजीवन शिक्षण व विस्तार विभाग,डॉ.बा.आं.म.वि.)
**अध्यक्षः- प्राचार्य,डॉ.एस.आर.टकले**

सत्र दुसरे :-वेळ १२:४५ ते २:००
विषय : लेखन व संभाषण कौशल्य
**वक्तेः-डॉ.कैलास इंगळे**
(मराठी विभाग,राजर्षी शाहू महाविद्यालय,पाथ्री )
**अध्यक्षः- डॉ.संजय पांचाळ**

**अल्पोपहार २ :०० ते २:३०**

सत्र तिसरे:- वेळ: २:३० ते ३:३०
विषय : व्यक्तिमत्त्व विकास
**वक्ते :- डॉ.सुरेश मुंढे**
**अध्यक्षाः- डॉ.मंजुषा नळगिरकर**

### गुरुवार,दिनांक २३ फब्रेवारी २०२३

सत्र चौथे :- वेळ: ११.०० ते १२.३०
विषय :-यशस्वी उद्योजकाची मुलाखत
**उद्योजक :- श्री.देवराव शेषराव पतंगे**
(संचालक,शक्ती डायमंड टुल्स )
**उद्योजक :- कु.अनिता देवराव पतंगे**
(मनुष्यबळ व्यवस्थापक,शक्ती डायमंड टुल्स )
**मुलाखत घेणारे :- डॉ.महेश थोरात**

**अल्पोपहार २.०० ते २.३०**

सत्र पाचवे:- वेळ:१२.४५ ते २:००
विषय :- स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन
**वक्तेः-श्री.धनंजय पाटील**
(प्रशासक,द युनिक ॲकॅडमी,औरंगाबाद )
**अध्यक्षः-डॉ.नितीन माळेगावकर**

समारोप सत्र :- वेळ २:३० ते ३:३०
विषयः मुलाखत तंत्र
**वक्तेः-प्रा.डॉ.रामकिशन लोमटे**
**अध्यक्षा :- प्रा.डॉ.राजश्री पवार**

### विनित

**कार्यक्रमाधिकारी**
डॉ.पी.एम.कल्याणकर
९५४५८९९४८४,८८३०९२७३२७

**सर्व प्राध्यापक व कर्मचारी**

**प्राचार्य**
डॉ.एस.आर.टकले

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

## आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग

## कार्यक्रम व उपक्रमांची प्रसिद्धी

## 20222-2023

सकाळ

# दरेगाव दरी येथे शेती विषयावर व्याख्यान

**फुलंब्री,ता.१(बातमीदार) :** आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने समाजस्तरावरील उपक्रमाअंतर्गत दरेगाव (दरी) येथे शेतीवर आधारित व्यावसायिक मार्गदर्शन या विषयावर प्रगतशील शेतकरी श्री भगवान कारभारी वाघ यांचे व्याख्यान झाले.

या कार्यक्रमास रतन ज्ञानदेव अंभोरे (सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळाचे सामाजिक कार्यकर्ते) यांची प्रमुख उपस्थिती होती, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे सरपंच गुणाजी जयराम मालोदे हे होते. यावेळी भगवान वाघ म्हणाले की, शेतकऱ्यांनी गट शेतीवर आपले लक्ष केंद्रित करून गट शेती करावी.

शेतकऱ्यांनी उत्पन्नाचे विविध स्रोत निर्माण केले पाहिजे. मका व कापूस हीच पारंपारिक पिके न घेता आपल्या शेतात कायमस्वरूपी उत्पन्न मिळवून देणारी झाडे लावावी.



**फुलंब्री : तालुक्यातील दरेगाव दरी येथे शेती विषयावर मार्गदर्शन करताना प्रगतशील शेतकरी भगवान वाघ.**

यावेळी रतन अंभोरे यांनी ग्रामीण विकास या विषयावर मार्गदर्शन केले. प्रास्ताविक डॉ.पी.एम कल्याणकर यांनी तर आभार सोसायटी चेअरमन श्यामराव मालोदे यांनी मानले. सूत्रसंचालन ऋतुजा अंभोरे यांनी तर पाहुण्यांचा परिचय ऋषिकेश अंभोरे यांनी करुन दिला. या कार्यक्रमास पोलिस पाटील बाबूराव मालोदे, तंटामुक्ती अध्यक्ष नाना पाटील मालोदे, शालेय समिती अध्यक्ष दिनकर भाऊ मालोदे, भाऊसाहेब मालोदे, माजी सरपंच बाजीराव मालोदे, सखाराम मालोदे, ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य उपस्थित होते.

Aurangabad, District-Today
02/03/2023 Page No. 4

महाराष्ट्र टाइम्स

# गटशेती करण्याला प्राधान्य द्या

## प्रगतशील शेतकरी भगवान वाघ यांचे आवाहन

म. टा. प्रतिनिधी, फुलंब्री



प्रगतशील शेतकरी भगवान वाघ यांनी दरेगाव दरी येथे शेतकऱ्यांना शेतीवर आधारित व्यावसायाबाबत मार्गदर्शन केले.

'एकाच शेतकऱ्याने प्रयोग करण्यापेक्षा शेतकऱ्यांनी गटशेतीच्या माध्यमातून शेती करण्याकडे लक्ष केंद्रित करावे,' असे प्रतिपादन प्रगतशील शेतकरी भगवान वाघ यांनी केले

तालुक्यातील दरेगाव दरी येथे आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने समाजस्तरावरील उपक्रमाअंतर्गत 'शेतीवर आधारित व्यावसायिक मार्गदर्शन' या विषयावर प्रगतशील शेतकरी भगवान कारभारी वाघ यांचे व्याख्यान झाले. या कार्यक्रमास सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळाचे सामाजिक कार्यकर्ते रतन अंभोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावचे सरपंच गुणाजी जयराम मालोदे होते.

या वेळी मार्गदर्शन करताना भगवानराव वाघ म्हणाले, 'शेतकऱ्यांनी उत्पन्नाचे विविध स्रोत निर्माण केले पाहिजेत. मका व कापूस ही पारंपरिक पिके न घेता आपल्या शेतात कायमस्वरूपी उत्पन्न मिळवून देणारी झाडे लावली पाहिजे.' या वेळी त्यांनी त्यांच्या तीन एकर शेतीवर आंबा, चिकू, लिंबू या फळवर्गीय झाडांची; तसेच शेवग्याची लागवड करून कायमस्वरूपी उत्पन्न मिळवून देणारे स्रोत निर्माण केल्याचे सांगितले. 'शेतकऱ्यांनी शेतमाल उत्पादित केल्यानंतर तो ग्राहकापर्यंत पोहोचवला पाहिजे. भाजीपाल्याची लागवड सातत्याने उत्पादन काढले पाहिजे,' असेही वाघ म्हणाले. या वेळी त्यांनी बागायतीप्रमाणेच कोरडवाहू क्षेत्रासाठी चिंच, शेवगा, बिब्बा या झाडांची लागवड करण्याचा सल्ला दिला.

या वेळी रतन अंभोरे यांनी ग्रामीण विकासावर मार्गदर्शन केले. गावाच्या सहकार्यातून गावात जलसिंचनाचे कामे करून जमिनीच्या पाण्याच्या पातळीत वाढ करता येईल, असे त्यांनी मत मांडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. पी. एम. कल्याणकर यांनी केले. श्यामराव मालोदे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन ऋतुजा अंभोरे हिने केले. पाहुण्यांचा परिचय हृषीकेश अंभोरे या विद्यार्थ्याने केला. या कार्यक्रमाला बाबूराव मालोदे, नाना मालोदे, दिनकर मालोदे, भाऊसाहेब मालोदे, बाजीराव मालोदे, सखाराम मालोदे व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

दिव्य मराठी
छत्रपती संभाजीनगर जिल्हा 02-03-2023

दिव्य मराठी विशेष • निवृत्ती जोरी यांचे प्रतिपादन, दरेगाव दरी येथे व्याख्यान

# मानवी आरोग्य, जमिनीसाठी तृणधान्य लाभदायी

प्रतिनिधी | फुलंब्री

बाजरी, ज्वारी, बाजरी, भगर, राळा, नाचणी यासारख्या तृण धान्यांचा आहारात वापर केल्यास त्यामुळे शरीरातील आयर्न, कॅल्शियम, प्रोटीन, मॅग्नेशियम यामध्ये वाढ होते आणि मनुष्य हा अधिक सुदृढ राहतो. त्यामुळे जमीन आणि मानवी आरोग्यासाठी तृणधान्ये ही लाभ कारी आहे असे प्रतिपादन मंडळ कृषी अधिकारी निवृत्ती जोरी यांनी केले.

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयाचा आजीवन शिक्षण, विस्तार विभाग व तालुका कृषी कार्यालय, फुलंब्री यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी दरेगाव (दरी) या गावात 'तृणधान्यातून ग्रामीण विकास' या विषयावर आयोजित व्याख्यानात जोरी हे बोलत होते. जोरी पुढे म्हणाले की, भारताने अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यासाठी गहू आणि तांदळाच्या उत्पादनावर भर दिला.

यातून आपण अन्नधान्याची स्वयंपूर्णता साधली असली तरीसुद्धा रासायनिक खते, कीटकनाशकांच्या अतिवापरामुळे जमिनीचा पोत खराब झाला. १९६५ पूर्वी भारतामध्ये तृणधान्य पिकांचे (भरड धान्य)मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतल्या जात होते. मनुष्य, जमिनीच्या आरोग्यासाठी तृणधान्यांचे महत्त्व भारताने जगाला लक्षात आणून दिल्यामुळे जगभरात २०२३ हे तृणधान्य वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी तृण धान्याच्या उत्पादनाकडे वळावे असा सल्ला त्यांनी दिला.



दरेगाव दरी येथे आयोजित व्याख्यानात बोलताना निवृत्ती जोरी.

यावेळी सरपंच गुणाजी मालोदे, अशोक चव्हाण, प्रा. डॉ. पी. एम. कल्याणकर, सोमनाथ ठाले, चेअरमन शामराव मालोदे, कृषी सहायक रामभाऊ साळुंके, विठ्ठल गोराडे, उपसरपंच वंदना मालोदे, नाना पाटील मालोदे, कुशावर्ता दुधे, अंबादास दुतोंडे आदींसह ग्रामस्थ, विद्यार्थी संख्येने उपस्थित होते.

### तृनाधान्याचे कमी उत्पादन खर्चात घेता येते पीक

ज्वारी, बाजरी, भगर, राळा, नाचणी आदी तृण धान्याचे देशात मोठ्या प्रमाणात उत्पादन होत होते. ही पिके हलक्या जमिनीत, कमी पावसात येतात, या पिकांवर बुरशी पडत नसल्यामुळे बुरशीनाशके, कीटकनाशकांचा फारसा वापर करावा लागत नाही. त्यामुळे कमी उत्पादन खर्चात पीक येते आणि जमिनीचा पोतही सुधारतो. गहू, तांदळाच्या आहारातील जास्तीच्या वापरामुळे माणसाच्या प्रकृतीवर त्याचा वाईट परिणाम होत आहे व रोगांचे प्रमाण वाढत आहे

महाराष्ट्र टाइम्स
matagold.in

# ‘तृणधान्य आरोग्यासाठी पोषक’

## ‘तृणधान्यातून ग्रामीण विकासा’वर दरेगावात व्याख्यान



दरेगाव (दरी) येथे तृणधान्यातून ग्रामीण विकास यावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

म. टा. प्रतिनिधी, फुलंब्री

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयाच्या आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग व तालुका कृषी कार्यालय, फुलंब्री यांच्यातर्फे दरेगाव (दरी) येथे 'तृणधान्यातून ग्रामीण विकास' या विषयावर मंडळ कृषी अधिकारी निवृत्ती जोरी यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

जोरी म्हणाले, 'भारताने अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यासाठी गहू आणि तांदळाच्या उत्पादनावर भर दिला. यातून आपण अन्नधान्याची स्वयंपूर्णता साधली असली तरीसुद्धा रासायनिक खतांच्या आणि कीटकनाशकांच्या अतिवापरामुळे जमिनीचा पोत खराब झाला. भारतामध्ये १९६५ च्या आधी तृणधान्य पिकांचे (भरड धान्य) मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जात होते. यामध्ये ज्वारी, बाजरी, भगर, राळा, नाचणी इत्यादी तृणधान्य पिकांचा समावेश होता. या पिकांना या पिकांवर बुरशी पडत नसल्यामुळे बुरशीनाशके आणि कीटकनाशकांचा फारसा वापर करावा लागत नाही.' 'गहू आणि तांदळाच्या आहारातील जास्तीच्या वापरामुळे माणसाच्या प्रकृतीवर त्याचा वाईट परिणाम होत आहे. रोगांचे प्रमाण वाढत आहे. बाजरी, ज्वारी, भगर, राळा, नाचणी यासारख्या तृणधान्यांचा आहारात वापर केल्यास त्यामुळे शरीरातील आयर्न, कॅल्शियम, प्रोटीन, मॅग्नेशियम यामध्ये वाढ होते आणि मनुष्य सदृढ राहतो. त्यामुळे जमीन आणि मनुष्याच्या प्रकृतीसाठी तृणधान्ये उपयुक्त आहेत. शेतकऱ्यांनी तृणधान्य पिकाच्या उत्पादनाकडे वळावे,' असा सल्ला त्यांनी दिला. या वेळी त्यांनी तृणधान्यावरील स्वरचित अभंग ऐकविला. अध्यक्षस्थानी सरपंच गुणाजी मालोदे होते. प्रास्ताविक प्रा. डॉ. पी. एम. कल्याणकर यांनी केले. या वेळी श्यामराव मालोदे, कृषी सहायक रामभाऊ साळुंके, विठ्ठल गोराडे यांनी मार्गदर्शन केले. या प्रसंगी डॉ. पी. एम. कल्याणकर, श्यामराव मालोदे, रामभाऊ साळुंके, वंदना मालोदे उपस्थित होते.

सकाळ



फुलंब्री : संत सावतामाळी महाविद्यालयात कार्यशाळेत बोलताना मान्यवर.

# विद्यार्थ्यांनी शिक्षणातून स्वतःला सिद्ध करावे

## डॉ.संजय मून यांच्याकडून विद्यार्थ्यांचे समुपदेशन

**फुलंब्री, ता.१(बातमीदार)** : विद्यार्थ्यांनी दर्जेदार शिक्षण घेऊन शिक्षणाच्या जोरावर स्वतःला सिद्ध केले पाहिजे. तसेच शिक्षणाच्या प्रवाहाबाहेर गेलेल्या तरुणांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे काम करावे, असे प्रतिपादन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे संचालक डॉ.संजय मून यांनी केले आहे.

फुलंब्री येथील संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयात आजीवन शिक्षण आणि विस्तार विभागाच्या वतीने दोन दिवसीय विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन नुकतेच करण्यात आले. यावेळी डॉ. मून हे बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ.एस. आर. टकले यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे प्रमुख डॉ.पांडुरंग कल्याणकर यांनी केले.

पुढे डॉ.मून म्हणाले की, विद्यार्थी हा देशातला महत्त्वाचा असा घटक आहे. समाजातील आणि शिक्षणातील बदल विद्यार्थ्यांपर्यंत पोचविणे. या बदलामागची भूमिका तथा याचा हेतू काय याचा विचार विद्यार्थ्यांनी केला पाहिजे. हीच भूमिका सांगण्यासाठी विस्तार विभाग कार्य करत आहे. या देशातील तरुणांना रोजगरक्षमतेची दिशा देण्याचा प्रयत्न अशा कार्यशाळांमधून करता येतो. कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात प्रा.डॉ.कैलास इंगळे यांनी ''लेखन व संभाषण कौशल्ये'' या विषयावर मार्गदर्शन केले. या सत्राचा अध्यक्षीय समारोप प्रा. डॉ.संजीवकुमार पांचाळ यांनी केला. प्रस्तुत कार्यशाळेच्या तिसऱ्या सत्रात ''व्यक्तिमत्त्व विकास'' या विषयावर प्रा.डॉ.सुरेश मुंढे यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप डॉ. मंजूषा नळगीरकर यांनी केला. चौथ्या सत्रात यशस्वी उद्योजकांची मुलाखत या विषयांतर्गत उद्योजक उत्तम पतंगे यांची वाणिज्य विभागाचे प्रमुख, प्रा.डॉ.महेश थोरात यांनी मुलाखत घेतली. पाचव्या सत्रात ''स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन'' या विषयावर धनंजय पाटील यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या समारोप सत्रात ''मुलाखत तंत्र'' या विषयावर प्रा.डॉ.रामकिसन लोमटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

Aurangabad, District-Today
02/03/2023 Page No. 3